# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय :– "शिष्यवृत्ती योजनांची सन २०२४–२५ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय/परिसंस्था यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत..."**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मा. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी संदर्भ पत्र क्र. जा.क्र.महाडीबीटी–२०२४–२५/(५११४९९/२०२४)/ शिष्यवृत्ती शाखा/६५८८, दि. ०८/०८/२०२४ अन्वये महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय/परिसंस्था यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करण्याचे आदेश दिले असून सदर सुविधा दि. २३/०७/२०२४ पासून देण्यात आलेली असल्याने कळविले आहे.

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी वरील संदर्भीय शासनाच्या पत्रानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/२४९४
दिनांक :१२/०८/२०२४

**सोबत :**

मा. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे दि.०८/०८/२०२४ रोजीचे पत्र

**प्रत:**

१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/(५११४९९/२०२४)/शिष्यवृत्ती शाखा/ ६५८८ दिनांक : ०८.०८.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - शिष्यवृत्ती योजनांची सन २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत..**

संदर्भ : - शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५/डीबीटी/५११४९९ दि. ०५.०८.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांनी महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करण्याची सुविधा दि. २३.०७.२०२४ पासून देण्यात आलेली आहे.

**महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांचेसाठी सूचना :-**

१. महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांनी त्यांचे डीबीटी पोर्टलच्या युजर आय.डी. व पासवर्ड च्या आधारे लॉगीन करुन महाविद्यालयाचे प्रोफाईल अद्ययावत करावयाचे आहे.

२. महाविद्यालयाला डीबीटी पोर्टलवर Reset Password / Update Password असा पर्याय आला असल्यास क्लर्क प्रिंसिपल यांनी युजर आय.डी. नमूद करुन आधार क्रमांक भरावा. तद्नंतर आधार संलग्न भ्रमणध्वनी / मोबाईल क्रमांकावर ओ.टी.पी. प्राप्त होतो तो नमूद करुन नवीन पासवर्ड भरावा. पासवर्ड अपडेटेड असा संदेश आल्यानंतर क्लर्क/प्रिंसिपल यांनी युजर आय.डी. आणि नवीन पासवर्डद्वारे लॉगीन करावे.

३. महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनमध्ये महाविद्यालयाची चालू अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत करणेची सुविधा देण्यात आलेली आहे. (उदा. महाविद्यालयात नवीन सुरु झालेला अभ्यासक्रम ADD करणे.)

४. शासन / विद्यापीठ यांनी निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणेच महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रमाचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच शुल्क निश्चितीबाबतची कागदपत्रे पडताळणीसाठी डीबीटी पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे.

५. कोणत्याही संस्थेने / महाविद्यालयाने / विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त अन्य कोणतीही रक्कम/शुल्क महाडीबीटी पोर्टलवर शुल्क मान्यतेकरीता भरु नये. तसेच शुल्क मान्यतेकरीता पाठविताना कागदपत्रांमध्ये अभ्यासक्रमाचे संलग्निकरण पत्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता दिलेले असेल तरच अपलोड करावे. कृपया मागील वर्षांचे संलग्नीकरण जोडू नये .याची सर्व संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

६. सामाजिक न्यायव व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी एकूण १६ प्रकारच्या इतर शुल्काच्या बाबींचा लाभ देण्यात येतो. तथापि महाडीबीटी पोर्टलवर इतर शुल्काच्या १० बाबींचा समावेश असल्यामुळे, महाविद्यालयांनी इतर शुल्काची माहिती पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार अचूक भरण्याची दक्षता घ्यावी.

| Sr. No. | महाडोबीटी पोर्टलवर नमूद करावयाच्या उपलब्ध सर्व शुल्क बाबी | महाविद्यालयांनी माहिती भरावयाच्या इतर शुल्कांच्या बाबी |
|---|---|---|
| 1 | Admission Fee | Admission Fee |
| 2 | Session Fee | Session Fee |
| 3 | Laboratory Fee | Laboratory Fee |
| 4 | Semester Fee | Semester Fee |
| 5 | Library Fee | Library Fee |
| 6 | Gymkhana Fee | Gymkhana Fee |
| 7 | Study Tour | Study Tour |
| 8 | Enrollment Fee | Enrollment Fee |
| 9 | Project Fee | Project Fee |
| 10 | Other Fee | 1. College Magzine Fee |
| | | 2. Computer Training Fee |
| | | 3. Extra Curriculum/ Activity Fee |
| | | 4. Registration Charges |
| | | 5. Student ID Chrarges |
| | | 6. University Development Fund |
| | | 7. University Ashwamedh Fund |
| | | 8. University Sports Fund |
| | | 9. University Medical Aid Fund |
| | | 10.University Students Assistance Welfare Fund |
| | | 11. University Student Insurance Fund |
| | | 12. Youth Festival Charges |
| 11 | Tution FEE | Tution FEE |
| 12 | Development Fee | Development Fee |
| 13 | Exam Fee | Exam Fee |

७. महाविद्यालयाने पोर्टलवर अद्ययावत केलेले अभ्यासक्रम व त्यांचे शुल्क या माहितीच्या आधारेच शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्यात येणार असल्यामुळे सदरची माहिती नमूद करणे आणि कागदपत्रे अचूक जोडणे आवश्यक आहे.

८. महाविद्यालयाचे लिपीकाचे लॉगीनमधून अद्ययावत करण्यात आलेले अभ्यासक्रम व शुल्क याबाबतची माहिती केवळ पाहता येते, अभ्यासक्रम अथवा शुल्क यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास फक्त प्राचार्य लॉगीनमधूनच करता येतो.

९. महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रम व अभ्यासक्रमाचे शुल्क याबाबतची माहिती दि. ०१.१२.२०२४ पर्यंत भरुन त्यास संबंधित सहसंचालक / सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती/ शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडून मान्यता घेणे आवश्यक आहे.

१०. महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील शुल्काबाबतची माहिती भरताना अभ्यासक्रमाचा जेवढा कालावधी असेल त्यापेक्षा दोन वर्ष अधिक कालावधीचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे.

( उदा. B.A. अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षांचा असल्याने सदर अभ्यासक्रमाची मागील ५ वर्षांची माहिती भरणे आवश्यक आहे. मागील ५ वर्षांचे शुल्क मान्यता झाली असल्यास आवश्यकता नाही.)

११. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क (शिक्षण शास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, विधी अभ्यासक्रम) हे बॅच प्रमाणे भरणे आवश्यक आहे.

१२. महाविद्यालयांनी डीबीटी पोर्टलसंदर्भात येणाऱ्या येणाऱ्या अडचणींसाठी या कार्यालयासोबत संपर्क करुन आपल्या अडचणी त्वरीत सोडवून पुढील कार्यवाही करावी.

१३. तसेच डीबीटी पोर्टल संदर्भात येणाऱ्या तांत्रिक अडचणी डीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या Grievance या लिंकच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यात याव्यात व ईमेलवर येणारो Ticket Number सविस्तर समस्या नमूद करुन क्लर्क आणि प्राचार्य युजर आयडी पासवर्ड , क्लर्क मोबाईल नंबर नमूद करुन पत्रासह या कार्यालयास ईमेल करावा.

१४. महाविद्यालयांनी इन्स्टिट्यूट प्रोफाईल अद्ययावत करणेसाठी डीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या व्हिडीओ व मॅन्युअल पाहून त्याप्रमाणे कार्यवाही केल्यास त्यांच्या अडचणी व शंकांचे निरसन होईल.

संबंधित सहसंचालक / सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती/ शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता शुल्क मान्य झाल्यानंतर त्यानुसारच शिष्यवृत्तीचे लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येतात. त्यामुळे सदरची माहिती काळजीपूर्वक भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.